# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी पाटबंधारे विभागाची जागा विनामुल्य हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१) ९९५८ (०९-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) या पुनर्वसीत गावातील नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविणेकरिता सन २०१२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाद्वारे सदर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ग्रामपंचायत सदर प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता लागणारी जागा खरेदी करणेकरिता सक्षम नसलेल्या कारणाने सदर केंद्राकरिता खास बाब म्हणून विनामुल्य जमीन उपलब्ध करुन देणेबाबत उमरगा व लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०६-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) माकणी, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी माकणी येथील पाटबंधारे विभागाची जागा विनामुल्य हस्तांतरीत करण्याबाबत जलसंपदा विभागाला विनंती करण्यात आली असून, त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानवत (जि.परभणी) येथील जुन्या नागरी दवाखान्याच्या (सिव्हील हॉस्पीटल) आरोग्य विभागाच्या जागेबाबत**

**(२) १५५५२ (११-०४-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) येथील जुन्या नागरी दवाखान्यांची (सिव्हील हॉस्पिटल) आरोग्य विभागाची जागा स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ-पाथरी या संस्थेस दिनांक ७ जुलै, १९९४ रोजी वा त्यासुमारास शासनाची आवश्यक परवानगी न घेता अल्पकाळासाठी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या अनधिकृतपणे ताब्यात असलेली जुन्या दवाखान्यांची जागा नगरपरिषदेने नियमबाहयपणे भोगवटदार रखान्यात सदर संस्थेचे नाव दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमाराच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर जागा व इमारत त्वरित ताब्यात घ्यावी, असे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जागा ताब्यात घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, पाथरी या संस्थेने त्यांचे विनंती अर्ज दि.०३.०७.१९९४ नुसार नागरी दवाखाना, मानवत येथील जागा मिळणेबाबत शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद परभणी यांचेकडे मागणी केली होती. त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद परभणी यांचे दि.०४.०७.१९९४ च्या पत्रान्वये मालमत्ता घर क्र.८-३-११ आठ खोल्या असलेली, व्हरांडा व खुली जागा, नागरी दवाखान्याची रिकामी जागा विद्यार्थीनीच्या शिक्षणासाठी संस्थेची स्वत:ची इमारत होईपर्यंत अल्प कालावधीसाठी देण्यात आली होती.

या जागेचा भोगवटदाराच्या रखान्यात स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, पाथरी यांचे नांव, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांचे दि.०४.०७.१९९४ चे पत्र व मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद कन्या विद्यालय, मानवत यांचे विनंती अर्जावरुन लावण्यात आले होते.

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद परभणी यांनी दि.२१.०२.२०१४ च्या पत्रान्वये भोगवटदाराचे नांव कमी करणेबाबत कळविल्यावरुन, मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत यांनी सदरील नोंदविण्यात आलेले भोगवटदाराचे नाव कमी केले आहे. सदर संस्थेने दि.०३.०७.२०१५ रोजी जागा रिकामी करुन जिल्हा परिषदेच्या ताब्यात दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयातील पदभरती व सोयीसुविधांबाबत**

**(३) २८१९६ (२९-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) येथील रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळूनही अद्याप येथे मंजूर आकृतीबंधानुसार पदभरती व सोयीसुविधा पुरविल्या गेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे सद्य:स्थितीत किती कर्मचारी कार्यरत आहेत,

(३) असल्यास, उर्वरित पदभरती व सोयीसुविधा पुरविण्यासाठी शासन स्तरावर काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०६-२०१९) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

कळंब जि.उस्मानाबाद येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या मंजूर ४७ पदांपैकी ३४ पदे भरण्यात आली आहेत. सदर रुग्णालयात सन २०१८-१९ मध्ये ५६७०६ ओपीडी, ३०२४ आयपीडी, ७३७ प्रसुती, ४८ सिझरियन शस्त्रक्रिया, ५८५ लहान-मोठया शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित १३ पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरोरा (जि.चंद्रपुर) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथे येणाऱ्या रुग्णांकडून अधिक रक्कम घेतल्याबाबत**

**(४) ३०२०६ (२१-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथे येणारे सिकसेलग्रस्त, अपंग व इतर रुग्णाकडून शासन नियमाचे उल्लंघन करुन अधिक रक्कम घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णाकडून अधिकच्या पैसा मागणी करण्याप्रकरणी चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) या प्रकरणी चौकशीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांच्या स्तरावरुन त्रि-सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने चौकशी अहवाल दिनांक २२.०२.२०१६ रोजी सादर केला आहे. तद्नुसार संबंधित दोषी वरिष्ठ लिपिक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने त्यांनी दिनांक ०५.०५.२०१६ अन्वये सादर केलेल्या स्पष्टीकरणात तक्रारदार यांनी कोणताही प्रकारचा दाखला दाखविलेला नसल्याने त्याची पावती फाडण्यात आली होती, त्यानंतर वाद होवू नये म्हणून पैसे परत केले, असे नमूद केले आहे. तथापि चौकशी अहवालानुसार वरिष्ठ लिपिकांनी शासकीय पावतीपेक्षा जास्त रक्कम संबंधिताकडून घेतल्याने त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून येते. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ६(२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ५ (१) अन्वये "ठपका" ठेवण्याची शिक्षा दिली आहे.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयांच्या आवारात चार**
**चाकी मोटारीचे प्रदर्शन भरविण्यात आल्याबाबत**

**(५) ३३०४४ (२१-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयांच्या आवारात एका कंपनीच्या आवारात अर्थपूर्ण देवाणघेवाण करून चार चाकी मोटारीचे प्रदर्शन भरविण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आर्थिक देवाणघेवाण करून जिल्हा रूग्णालयाच्या आवारात मोटारीचे प्रदर्शन भरण्यास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०१९) :** (१) जिल्हा रुग्णालय, अहमदनगरच्या आवारात मोटारींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तथापि, आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांनी संबंधित प्रशासकीय अधिकारी यांचा दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या ज्ञापनाद्वारे खुलासा मागविला होतो. प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१८ रोजी लेखी खुलासा केला असून, सदरचा खुलासा अमान्य करण्यात आला आहे.

संबंधित प्रशासकीय अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, संबंधित प्रशासकीय अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हा रुग्णालयांतून रूग्णांना मुदत बाह्य गोळया दिल्याबाबत

**(६) ३३०५३ (१८-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा रुग्णालयांतून रूग्णांना मुदत बाह्य गोळया दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणा-या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयातील परिचारिका प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीच्या मृत्यूबाबत

**(७) ३७७६४ (२३-०१-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयातील उपचार घेणाऱ्या परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी सुप्रिया बाबू माळी या विद्यार्थिनीचा आजारी असतांना वसतिगृहातील व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे मृत्यू दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी व त्यासुमारास झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

श्रीमती सुप्रिया बाबू माळी या विद्यार्थिनीचा दि.२३.०९.२०१५ रोजी मृत्यू झाला आहे.तथापि व्यावस्थापनाच्या दुर्लक्षामुळे सदर मृत्यू झालेला नाही.

(२) होय.

सदर प्रकरणी चौकशी समिती गठित करून सखोल चौकशी करण्यात आली. श्रीमती माळी या रुग्णालयात दाखल झाल्यापासून संबंधीत वैद्यकीय अधिकारी व शुश्रृष कर्मचारी यांनी तिच्या प्रकृतीची तपासणी करुन औषधोपचार व योग्य देखभाल केल्याचे निषपन्न झाले.चौकशी अहवालानुसार श्रीमती माळी यांचा मृत्यू Brainstem Infarct Secondary and Encephalitis/Intracranial Hemorrhage मुळे झाल्याचे निष्पन्न झाले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये असलेल्या रिक्त पदांबाबत**

**(८) ३८२४६ (२३-०६-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाचे केलेल्या तपासणीत (ग्रामीण आरोग्य आकडेवारी २०१४-१५) महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुमारे ४३१ मनुष्यबळाचा अभाव असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रसूतीतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, चिकित्सक इत्यादी महत्वाची पदे सदरील ग्रामीण भागांतील आरोग्य क्रेंद्रामध्ये तात्काळ भरणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनामार्फत चौकशीअंती कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली वा प्रस्तावित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) होय.

केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या ग्रामीण आरोग्य सेवा आकडेवारी २०१४-१५ च्या अहवालात २०१४ पेक्षा २०१५ मध्ये ए.एन.एम.ची व क्ष किरण तंत्रज्ञांची संख्या कमी झाल्याचे नमूद केले होते.
(२) होय, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्राथमिक स्वरुपाच्या वैद्यकीय सेवा देण्यात येत असल्याने याठिकाणी आकृतीबंधानुसार एम.बी.बी.एस व बी.ए.एम.एस वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतात व तज्ञ सेवा हया ग्रामीण /उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयात उपलब्ध करुन देण्यात येतात.
(३) आकृतीबंधानुसार मंजूर पदांपैकी पदे रिक्त अनेक विविध कारणांमुळे रिक्त झाल्याने सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे व आवश्यकतेनुसार राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियानाअंतर्गत ही कंत्राटी स्वरुपात रिक्त पदांवर नियुक्त्या करुन रुग्णसेवा सुरळीतपणे देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) तालुक्यातील आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथील पदे रिक्त असल्याबाबत**

**(९) ४४९६१ (१२-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) तालुक्यातील सुमारे सव्वा दोन लाख जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करुन उभारलेल्या आरोग्य केंद्रे येथील बहुतांश पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि आष्टी तालुक्यातील आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यामधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकिय अधिकारी गट अ वर्ग २ ची ५ पदे भरलेली आहे. तथापि

| | |
|---|---|
| वैद्यकीय अधिकारी गट अ वर्ग २ ची | ६ पदे |
| औषध निर्माण अधिकारी वर्ग ३ ची | ४ पदे |
| आरोग्य सहाय्यक वर्ग ३ ची | २ पदे |
| आरोग्य सेवक (पुरष) वर्ग ३ ची | २४ पदे |
| आरोग्य सेवक (महिला) वर्ग ३ ची | २० पदे रिक्त आहेत. |

(२) व (३) गट अ व वर्ग २ ची पदे भरण्याबाबत शासनस्तरावरून कार्यवाही सुरू आहे. तसेच वर्ग३ ची रिक्त पदे भरण्याबाबतची प्रक्रिया ग्रामविकास विभागाचे स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिपरी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील आरोग्य उपकेंद्रात कायमस्वरुपी आरोग्य सेविकेचे पद रिक्त असल्याबाबत**

**(१०) ४६२७१ (१३-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपरी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील आरोग्य उपकेंद्रात कायमस्वरुपी आरोग्य सेविका मागील चार महिन्यांपासून येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आरोग्य उपकेंद्रात कायमस्वरुपी आरोग्य सेविका नियुक्ती करणेबाबत जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामस्थांनी मागणी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) चिपरी उपकेंद्रातील आरोग्य सेविकेला दि.१.०९.२०१५ पदोन्नती मिळाल्याने सदर पद रिक्त झाले होते. तथापि जून २०१६ पासून नियमित आरोग्य सेविका कार्यरत आहेत.

(२) नाही.

नियमित पद रिक्त होते त्यावेळी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत कंत्राटी आरोग्य सेवक या रिक्त पदी कार्यरत होते व रुग्णसेवा देण्यात येत होती.

(३) होय.

(४) रिक्त आरोग्य सेविकाच्या पदी नियमित आरोग्य सेविकांची पदस्थापना केली आहे. दरम्यान रिक्त पदांवर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत आरोग्य सेक व सेविका यांची नियुक्ती करण्यात आली होती व रुग्णसेवा देण्यात येत होती..

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर नगरपालिका हद्दीतील शिवाजीनगर भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील पद भरतीबाबत**

**(११) ५०२३२ (१३-०५-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर नगरपालिका हद्दीतील शिवाजीनगर भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण होऊन एक वर्ष झाले तरी या आरोग्य केंद्रासाठी कर्मचारी व डॉक्टर याची भरती करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी व डॉक्टर भरती न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, त्यामुळे तेथील नागरिकांना वैद्यकीय सेवेपासून वंचित रहावे लागत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडची कार्यवाही केली वा येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) नगरपालिका सिन्नर यांच्याकडून पदभरती होऊ न शकल्यामुळे पदभरती करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना देण्यात आली आहे. पदभरती कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही. सद्यस्थितीत सिन्नर नगरपरिषदेच्या दवाखान्या मार्फत नागरीकांना बाह्यरुग्ण सेवा देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चष्माच्या दुकानात ऑप्टोमेट्रिस्टची नियुक्ती करण्याबाबत

**(१२) ५४९१६ (०१-०९-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औषधांच्या दुकानात फार्मासिस्ट, पॅथॉलॉजी लॅबमध्ये पॅथॉलॉजिस्ट असणे जसे बंधनकारक आहे त्याच प्रमाणे चष्म्याच्या दुकानात डोळ्यांचा नंबर काढण्यासाठी ऑप्टोमेट्रिस्ट नियुक्ती करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईसह राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील ऑप्टिशियनच्या दुकानात ऑप्टोमेट्रिस्ट शिवायच दुकानातील सेल्समनकडून डोळ्यांचा नंबर दिला जात असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) साधारणपणे डोळ्यांची तपासणी नेत्रतज्ञ अथवा ऑप्टोमेट्रीस्ट मार्फत करण्यात येते. तपासणी नंतर नेत्रतज्ञ तसेच ऑप्टोमेट्रीस्ट यांचे मार्फत संबंधित व्यक्तींस डोळ्यांचा नंबर काढून त्याचे Prescription त्यांना देण्यात येते. या Prescription प्रमाणे चष्म्यांच्या दुकानात चष्मा तयार करण्यात येवून त्या व्यक्तीस देण्यात येतो. यामुळे चष्म्यांच्या दुकानात डोळ्यांचा नंबर काढण्यासाठी ऑप्टोमेट्रिस्टची नियुक्ती करणे बंधनकारक मानण्यात आलेले नाही.
(२) ऑप्टिशिसनच्या दुकानात ऑप्टोमेट्रिस्ट ऐवजी इतर सेल्समन मार्फत डोळ्यांचा नंबर दिला जात असल्याच्या तक्रारी विभागाला अथवा संचालनालयाला प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव

**(१३) ५५५४८ (०१-०९-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची चांगली सेवा व सर्व सोईयुक्त असलेल्या रुग्णालयांना उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठीचा प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांच्या मार्फत शासनाकडे सादर झालेला असून सदरील प्रस्ताव शासन स्तरावर मागील ५ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नविन रुग्णालय सुरु करणे व रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे याबाबत जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून उमरी येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व तांत्रिक विभागातील कर्मचारीही खासगी रुग्णालयात अतिरिक्त कामे करीत असल्याबाबत

**(१४) ५७३६० (३०-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचे खाजगी दवाखाना सुरु असून तसेच तांत्रिक विभागातील कर्मचारीही खासगी रुग्णालयात अतिरिक्त कामे करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच जिल्हा रुग्णालयाच्या नविन इमारतीत नविन एक्सरे मशिन पडून असून त्यांचा वापर होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा रुग्णालय, नाशिकसाठी पीपीपी अंतर्गत सीटी स्कॅन आणि क्ष-किरण यंत्र सार्वजनिक आणि खाजगी भागीदारी तत्वावर विप्रो/जीई पब्लिक पार्टनरशिप (पीपीपी) कंपनीस देण्याबाबत आदेश आरोग्य सेवा संचालनालयास प्राप्त झाले. त्या अनुषंगाने जिल्हा रुग्णालय, नाशिक यांनी दिनांक २१ जून, २०१३ च्या आदेशाद्वारे कंपनीला सीटी स्कॅन आणि क्ष-किरण यंत्र बसविण्यासाठी दिनांक २१ जून, २०१३ रोजी जागा वर्ग केली. कंपनीच्या आराखडयानुसार

बांधकाम सुरु करण्यात आले. परंतु कालांतराने विप्रो कंनीकडून पुढील कार्यवाही न झाल्याने बांधकाम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आल्याने नव्याने बांधकाम पूर्ण् झालेले सिंहस्थ कुंभमेळा इमारतीत नव्याने प्राप्त झालेले क्ष-किरणयंत्र कार्यान्वित करण्यात आले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पूरप्रवण क्षेत्रात बहुउद्देशीय निवारे बांधण्याबाबत**

**(१५) ६४१६० (०४-०१-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पूरप्रवण क्षेत्रात ओडीसा शासनाने चक्रीवादळ प्रवण क्षेत्रात बांधलेल्या बहुउद्देशीय निवा-याच्या धर्तीवर बहुउद्देशीय निवारे बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी (आर्णी) यांनी मा. मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त मागणीनुसार पूरप्रवण क्षेत्रात बहुउद्देशीय निवारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१९) :** (१) होय.
(२), (३) व (४) घाटंजी तालुक्यामध्ये १७ गावे ही पूरप्रवण क्षेत्रात येत असल्यामुळे बहुउद्देशिय निवारे बांधण्याबाबत संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांना सूचित करुन पूरप्रवण क्षेत्रात ओडिसा शासनाने चक्रीवादळ प्रवण क्षेत्रात बांधलेल्या बहुउद्देशी निवाराचे धर्तीवर बहुउदेशिय निवारे बांधण्याबाबत गावातील सरपंच यांना याबाबत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**भूम (जि.उस्मानाबाद) ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळणेबाबत**

**(१६) ६६४७९ (०४-०१-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा-भूम वाशी मतदार संघातील (जि.उस्मानाबाद) भूम हा तालुका उपजिल्हा असून तालुक्यामध्ये एकूण ९६ गावे असल्याने ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींली मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयात सर्पदंश, श्वान यावर लस नसल्याने तसेच इतर औषधे उपलब्ध नसल्याने या रुग्णालयात सर्व प्रकारची औषधे तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) ग्रामीण रुग्णालय, भूम, जि.उस्मानाबाद येथे इंजेक्शन एआरव्ही (आयएम) - १०० व्हायल्स व इंजेक्शन एएसव्ही - १०० व्हायल्स एवढा साठा उपलब्ध आहे. तसेच, भूम येथे औषधी साठा उपलब्ध असून पुरेशा प्रमाणात श्वानदंश व सर्पदंशावरील लसी उपलब्ध आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्हा रुग्णालयात कामाच्या अतिरिक्त ताणामुळे परिचारिकेचा झालेला मृत्यु

**(१७) ६७५४० (२७-०१-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयातील कामाच्या अतिरिक्त ताणामुळे परिचारिका शैला साळवे यांचा मृत्यु झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) श्रीमती. शैला साळवे, परिसेविका यांचा मृत्यू दि.१४.०८.२०१६ रोजी झाला आहे.ही बाब खरी आहे. तथापि जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथे १८ मंजूर परिसेविकांपैकि १६ पैकि भरलेली होती. तसेच सर्व शुश्रुषा संवर्गातील पूरेसा कर्मचारी वर्ग उपलबध्द होता. त्यामुळे त्यांचा मृत्यू कामाच्या अतिरिक्त ताणामुळे होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) होय.

जिल्हा शल्य चिकित्सक अहमदनगर व उपसंचालक आरोग्यसेवा नाशिक यांचे मार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात आली.

(३) सदर प्रकरणी प्राप्त अहवालानुसार श्रीमती साळवे दि.१३.०८.२०१६ रोजी त्यांच्या नियमित कर्तव्यावर हजर होत्या व कर्तव्य कालावधी नंतर घरी गेल्या होत्या. त्यांना कोणतेही अतिरिक्त कर्तव्य देण्यात आले नव्हते. दि.१४.०८.२०१६ रोजी त्यांना घरी त्रास होऊ लागल्यामुळे रुग्णालयात औषधोपाचारासाठी आणण्यात आले होते. त्यावेळी त्यांना मृत घोषीत करण्यात आले होते. चौकशी दरम्यान संबंधीत अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक व अधिसेविका यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी स्वत:च्या कुटुंबियांच्या नांवे खाजगी रुग्णालये सुरु करुन प्रॅक्टीस करीत असल्याबाबत**

**(१८) ७००९१ (२७-०१-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी स्वत:च्या कुटुंबियांच्या नांवे खाजगी रुग्णालये सुरु करुन त्यामध्ये खाजगी प्रॅक्टीस करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा ग्रामीण रुग्णालयात आलेल्या रुग्णांना स्वत:च्या नातेवाईकांच्या खाजगी रुग्णालयात पाठविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे अधिकारी खासगी प्रॅक्टीस करता यावी यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा ग्रामीण रुग्णालयामध्ये न राहता अन्यत्र रहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषी आढळल्यास दोषींवर कोणती कारवाई करणार वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांच्या नावे खाजगी रुग्णालये सुरु आहेत. तथापि सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी प्रॅक्टीस करताना निदर्शनास आले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापुर जिल्हयातील जिल्हा, ग्रामीण व उपकेंद्र रुग्णालयात खरेदी केलेल्या एक्सरे मशीन विनावापर पडून असल्याबाबत**

**(१९) ७०४२९ (२७-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्हयातील जिल्हा, ग्रामीण व उपकेंद्र रुग्णालयात २२ एक्सरे मशीन खरेदी केल्या आहेत, मात्र ७ वर्षापासून टेक्निशिनयची पदे भरली नसल्याने साधनसामुग्री वापराविना पडून असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सोलापुर जिल्हयात आरोग्य विभागात रिक्त असलेली टेक्निशियनची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयाचे बाबतीत हे खरे नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राचे व उपकेंद्राचे बाबतीत सोलापूर जिल्हा परिषदेने स्वनिधीतून २००८-०९ व २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये २२ क्ष किरण यंत्र खरेदी केल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रात क्ष किरण तंत्रज्ञाचे पद मंजूर नसल्याने तेथील काही आरोग्य कर्मचाऱ्यास वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षण देऊन काही क्ष किरण यंत्रे कार्यन्वीत करण्यात आली आहेत व उर्वरीत एक्स रे मशिन्स ग्रामीण रुग्णालयाकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंजूर आकृती बंधानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात क्ष किरण तंत्रज्ञाचे पद मंजूर नाही. तथापि, जिल्हा रुग्णालयांतर्गत क्ष किरण तंत्रज्ञांची पदे भरलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक आरोग्य सेवेत काम करणा-या परिचारिकांच्या मागण्यांबाबत**

**(२०) ७४३७० (१८-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेत काम करणाऱ्या सात हजार परिचारिकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी तीन दिवसांच्या संपावर जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण व स्त्री रुग्णालयात दाखल रुग्णांच्या वैद्यकीय सेवेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन या परिचारीकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) परिचारिकांच्या मागण्यांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे-

१. बंधपत्रित परिचारिकांना सेवेत नियमित करण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही सुरू आहे.

२. कालावधी पूर्ण झालेल्या व विनंतीनुसार करावयाच्या बदल्या याबाबत बदली अधिनियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

३. परिचारिकांसाठी निश्चित केलेल्या गणवेशाची अंमलबजावणी झाली आहे.

४. परिचारीकांची पदे मंजूर करणे व भरणे याबाबत कार्यवाही सुरू आहे.

५. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलमध्ये परिचारिकांची नोंदणी करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाकडून कार्यवाही करण्यात येते.

६. परिचारिकांना लिपिकाचे काम देऊ नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

७. परिचारिकांच्या प्री-रिव्हॉईज्ड वेतन व ग्रेड पे बाबत च्या मागण्या सातव्या वेतन आयोगाच्या समितीसमोर सादर करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयामध्ये हेल्थ स्किमच्या नावाखाली भरमसाठ फी आकारुन फसवणूक करित असल्याबाबत

**(२१) ७८४६४ (२१-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून हेल्थ स्किमच्या नावाखाली भरमसाठ फी घेऊन कार्यशाळा संचालक फसवणूक करित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कर्मचा-यांना हेल्थ स्कीमच्या नावाखाली लुबाडणाऱ्या कार्यशाळा संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील संदर्भ रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णाने आत्महत्या केल्याबाबत**

**(२२) ७९३७३ (१८-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील संदर्भ रुग्णालयात उपचार घेणा-या ईश्वर शेजवळ यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास रुग्णालयाच्या तिस-या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) या संदर्भात भद्रकाली पोलिस ठाणे, नाशिक शहर यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार मयत रुग्ण ईश्वर शेजवळ याने त्याच्या किडनीच्या आजाराला कंटाळून आत्महत्या केली असल्याचे निष्पन्न झाले असून मरणाबाबत मृताच्या नातेवाईकांची किंवा साक्षीदारांची कोणतीही तक्रार नसून त्यांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी (जि.रत्नागिरी) जिल्हा रुग्णालयामधील रिक्त पदांबाबत**

**(२३) ८३३६७ (२०-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी (जि.रत्नागिरी) जिल्हा रुग्णालयामध्ये अपुरा कर्मचारी वर्ग व सुविधांची कमतरता असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर रुग्णालयाकडून शासनाकडे सदर प्रकरणी मागणी होऊनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९)** :(१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील मंजूर, भरलेल्या, रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग ३ | २१५ | १४७ | ६८ |
| २ | वर्ग ४ | १४९ | १०३ | ४६ |
| | एकूण | ३६४ | २५० | ११४ |

रिक्त पदांवर सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कंत्राटी पध्दतीने कर्मचारी उपलब्ध करुन सुरळीतपणे रुग्णसेवा देण्यात येत आहे.
(२) व (३) सन २०१६ मध्ये वर्ग ३ व वर्ग ४ ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली होती त्यातून रिक्त पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित रिक्त पदांवर पदोन्नती/बदली व पदभरतीची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय मनोरुग्णालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२४) *८५१२५* (११-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मनोरुग्णांची संख्या वाढत असून जागतिक आरोग्य संघटनेनेही यंदाचे वर्ष 'डिप्रेशन लेट्स टॉक' म्हणून साजरे करण्यासाठी दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत 'चला बोलू या, नैराश्य टाळूया' या संकल्पनेवर तरुणाई व वृध्दामधील नैराश्यावर उपाय करणाऱ्या व्यापक योजनेचे उद्घाटन करण्यात आले, हे खरे आहे काय
(२) राज्यातील, ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी, या चार ठिकाणच्या शासकीय मनोरुग्णालयात, मनोविकार तज्ञ, डॉक्टर, परिचारिका, अटेंडन्ट, तंत्रज्ञ, रुम बॉय, चतुर्थश्रेणी कामगार आदींची मोठया प्रमाणात पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयातील मंजूर पदांपैकी एकूण किती पदे रिक्त आहेत, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,
(४) तसेच, राज्यातील, २३ जिल्हा रुग्णालयात, ८९ मंजूर पदापैकी, ७२ मनोविकार तज्ञांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी येथील पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| मनोरुग्णालयाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| पुणे | ९५४ | ७२५ | २२९ |
| ठाणे | ७२३ | ५४८ | १७५ |
| नागपूर | ३७५ | २७५ | ११८ |
| रत्नागिरी | १४४ | ९३ | ५१ |

सदर रिक्त पदे आवश्यकतेनुसार पदोन्नतीने व सरळसेवा भरतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मनोविकारतज्ञ पदे भरण्याची जाहिरात देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदांसह श्रेणीवर्धनासाठी मंजूर निधी उपलब्ध करणेबाबत

**(२५) ८६८६९ (१९-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हा शासकिय रुग्णालयामध्ये वर्ग १ ची १७, वर्ग २ ची ५, वर्ग ३ ची ११४ व वर्ग ४ ची ९५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात पदे रिक्त असल्याकारणाने रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्यासह मंजूर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद येथील वर्ग-१ ची १९ पदे मजूर असून त्यापैकी ८ पदे भरलेली आहेत व ११ पदे रिक्त आहेत. वर्ग-२ ची ३३ पदे मंजूर असून ३३ पदे भरलेली आहेत. तसेच वर्ग-३ ची २५१ पदे मंजूर आहेत, त्यापैकी १९५ पदे भरलेली असून ५६ पदे रिक्त आहेत व वर्ग-४ ची १७३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३६ पदे भरलेली असून ३७ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.

उस्मानाबाद जिल्हा रुग्णालयात विविध आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण येत असतात व त्यांना वेळेवर रुग्ण सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ ची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-अ मधील पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील मंडळ स्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली असून, सदर पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच रुग्णालयाच्या आय.पी.डी. इमारत

बांधकामास रु २७३४.१७ लक्ष मंजूर झाला असून तो सर्व निधी खर्च झालेला आहे. आय. पी.डी., ओ.पी.डी. इमारतीच्या अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या बाबींचे काम पूर्ण करणेसाठी आवश्यक निधीची वाढीव मागणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील आरोग्य विभागातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) ८९८१५ (१९-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील आरोग्य विभागात १७४१ मंजूर पदे त्यापैकी १४१८ भरलेली पदे तर ३२३ रिक्त पदे असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विक्रमगड आणि जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम भागातील नागरिकांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्यात या भागात वेळेवर औषधोपचार न मिळाल्यामुळे बालमृत्युचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार रुग्णांना पुर्ण क्षमतेने औषधोपचार मिळावेत तसेच रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर येथे व त्यांचे अधिनस्थ एकूण ३ उपजिल्हा रुग्णालये व ९ ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत. (ग्रामीण रुग्णालय, खानिवडे, मांडवी अद्याप कार्यान्वित नाही) उपरोक्त रुग्णालयांसाठी एकूण ४८१ पदे मंजूर असून त्यापैकी ३३९ पदे भरलेली आहेत व १४२ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.

कुटीर रुग्णालय, जव्हार येथे मंजूर ९४ पदांपैकी ६३ पदे भरलेली असून ३१ पदे रिक्त आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड येथे मंजूर २५ पदांपैकी १४ पदे भरलेली असून ११ पदे रिक्त आहेत. तथापि, रिक्त पदांमुळे रुग्णसेवा देण्यास कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण झालेल्या नसून रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येतात.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच गट क पदे भरण्याबाबत भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून त्याद्वारे जिल्हयातील विविध आरोग्य संस्थांमधील गट क रिक्त पदांवर पात्र उमेदवारांना पदस्थापना देण्यात आलेली आहे.

सदर गट ड ची पदभरतीकरिता जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांनी गट ड वर्गातील कक्ष सेवकांची ३४ पदे व अपघात विभाग सेवांची ३ पदे अशी एकूण ३७ पदे भरण्याबाबत प्रस्तावित केले आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**औरंगाबाद-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाचाड येथील ट्रामा केअर सेंटरची झालेली दुरवस्था**

**(२७) ९१४२८ (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाचाड येथील ट्रामा केअर सेंटरमध्ये दिनांक १७ जून २०१७ रोजी वा त्यासुमारास गरोदर महिला उपचारासाठी आली असताना डॉक्टर व इतर कर्मचारी नसल्याने सुमारे ६ तास उपचाराअभावी राहिल्याने सदर घटनेच्या गैरकारभारामुळे स्थानिक नागरिकांनी ग्रामीण रुग्णालयाला कुलूप लावून बंद केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात डॉक्टर व कर्मचारी गैरहजर व मशीन बंद असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर तक्रारींची दखल घेऊन शासनस्तरावरून चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या चौकशीत काय आढळून आले व दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) डॉ.साकिब अंजुम सौदागर, वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय, पाचोड यांना दि.१८.०६.२०१७ पासुन सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते. तसेच चौकशीत ते दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात हिवताप अधिकारी कार्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(२८) ९१६८९ (१९-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयात ४२६ मंजूर पदापैकी सुमारे १८२ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार रिक्त पदे भरण्यासाठी कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) रिक्त पदांच्या ७० टक्के पदांसाठी जानेवारी, २०१६ मध्ये पदभरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती व ऑगस्ट, २०१७ पर्यंत वर्ग-३ व ४ च्या कर्मचाऱ्यांची नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरीत सर्व रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यास्तव पदोन्नती व पदभरती प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील राज्य कामगार विमा रुग्णालयाकडून रुग्णांची होणारी गैरसोय**

**(२९) ९५९६१ (२८-११-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कामगार विमा योजनेअंतर्गत नाशिक येथे राज्य कामगार विमा योजना रुग्णालय सुरु केले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर रुग्णालयात रुग्णांना व त्यांच्या कुटूंबियातील सदस्यांना उपचार मिळत नसून रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(३) असल्यास, महिन्याकाठी १ लाख ६१ हजार ९५० कामगारांच्या वेतनातुन तब्बल ७ ते ८ कोटी रुपये जमा होऊन देखील ईएसआय रुग्णालयाकडून उपचार मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) होय.

भारतीय ट्रेड युनियन केंद्र नाशिक जिल्हा कमिटी या कामगार संघटनेने राकावियो रुग्णालय, नाशिक येथील रिक्त पदे भरणे, नवीन वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री खरेदी, व वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती इत्यादी बाबत दिनांक १७.०५.२०१७ रोजी वैद्यकीय अधीक्षक,

राकावियो रुग्णालय, नाशिक यांना निवेदन दिले होते. त्यानुषंगाने दिनांक ०३.०८.२०१७ रोजी तत्कालिन आयुक्त, राकावियो यांना सदर रुग्णालयाच्या प्रश्नांबाबत भारतीय ट्रेड युनियन केंद्र नाशिक जिल्हा कमिटी यांच्याशी सविस्तर चर्चा केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील आयजीएम दवाखान्यामध्ये लसींचा तुटवडा असल्याबाबत**

**(३०) ९६०३८ (२७-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील (इंदिरा गांधी मेमोरीयल) आयजीएम रुग्णालयामध्ये लहान मुलांना गोवर धर्नुवात, काविळ, पोलिओ अशा प्रतिबंधक लसीबरोबर अन्य काही दिल्या जाणाऱ्या लसीचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, व त्यानुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये गोवर, कावीळ, धर्नुवात, पोलिओ, बीसीजी, आयपीव्ही आणि पेन्टा व्हॅलेंट या सर्व लसी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत्या. डिपीटी लसीचा पुरवठा दि.१८/०९/२०१७ रोजी करण्यात आला होता.

केंद्र शासनाकडून राज्य शासनाला डिपीटी लसीचा पुरवठा केला जातो. दि.१३/९/२०१७ रोजी केंद्राकडून राज्य शासनास लसीचा पुरवठा झाल्यानंतर कोल्हापूर जिल्हयास पुरवठा करण्यात आला. त्यामुळे दि.१८/०९/२०१७ पासून इचलकरंजी येथील आयजीएम दवाखान्यामध्ये लस उपलब्ध होती.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांच्या अंमलबजावणीबाबत**

**(३१) ९६९१६ (२७-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोगांवर निदान व त्याचे निवारण करणाऱ्या यंत्रणेला सर्वसाधारण गटात टाकल्याने व अवैद्यकीय सहायकांची रिक्त पदे अनेक वर्षापासून भरण्यात न आल्यामुळे त्याचा निर्मुलनाचा कार्यक्रमास बाधा आल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, कुष्ठरोगाचे रूग्ण शोधुन त्यावर प्रभावी औषधोपचार करणाऱ्या यंत्रणेला सर्वसाधारण गटात टाकण्यात आल्याने व १२ अवैद्यकीय सहायकांची रिक्त पदे अनेक वर्षापासून भरण्यात न आल्यामुळे कुष्ठरोगांच्या रूग्णांच्या संख्येत दरवर्षी वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये कुष्ठरोगाचे ७८४ नवे रूग्ण आढळुन आले असुन त्यात ग्रामीण भागातील ४४८ तर शहरी भागातील ३३६ रूग्णांची नोंद करण्यात झालेली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कोणत्या उपाययोजना व निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे असल्यास त्यांचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, न राबविण्याची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) खरे नाही.

सन २००५ पासून राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाची अंमलबजावणी शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व साधारण आरोग्य सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून करण्यात येत आहे. अवैद्यकीय सहाय्यक हे कुष्ठरोगतंत्रज्ञ असून त्यांच्याकडून तालूका व जिल्हास्तरावरुन कार्यक्रमाच्या संनियंत्रणांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. सर्वसाधारण आरोग्य कर्मचारी हे संपूर्ण ग्रामीण भागात कार्यरत असल्यामुळे कार्यक्रमांच्या अंमलबजावणीला बाधा आलेली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यात अवैद्यकीय सहाय्यकांची १३८ पदे रिक्त आहेत.

तथापि, सन २००५ मध्ये राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाचे सर्वसाधारण आरोग्य सेवेमध्ये एकत्रिकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे नविन कुष्ठरोग शोधण्यासाठी सर्वसाधारण आरोग्य सेवेतील कर्मचारी सर्वेक्षण करुन नविन कुष्ठरुग्ण शोधण्याचे काम करतात.

सन २०१६ पासून केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यात कुष्ठरुग्णभार जास्त असलेल्या जिल्हयांमध्ये विशेष कुष्ठरुग्णभार जास्त असलेल्या जिल्हयांमध्ये विशेष कुष्ठरुग्ण शोध मोहिमा राबविण्यात आलेल्या आहेत. या माहिमेमध्ये घरोघर जाऊन रुग्णांचा शोध घेतल्यामुळे रुग्णसंख्या वाढलेली आहे. मात्र त्यामुळे निदान न झालेले रुग्ण उपचाराखाली येत असल्यामुळे निर्मुलनाकडे राज्याची वाटचाल चालू आहे.

(३) हे खरे आहे.

(४) जिल्हयांमध्ये कुष्ठरोगांचे निर्मुलन करण्याकरीता विशेष कुष्ठरुग्ण शोध मोहिम, आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रम, शालेय आरोग्य तपासणी इ. कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच कुष्ठरुग्णांसाठी सर्व म.न.पा आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालये येथे मोफत निदान व उपचार विकृती रुग्णांसाठी विकृती प्रतिबंध व वैद्यकीय पुर्नवसन कार्यक्रम इत्यादी शासनामार्फत उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोणगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील पुलावरुन गोदावरचे पाणी वाहत असल्यामुळे वैजापूर- श्रीरामपूर मार्ग पुरामुळे ठप्प झाल्याबाबत**

**(३२) १०२९५६ (२९-१२-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगरसह नाशिक जिल्हयातील जोरदार पावसामुळे अहमदनगर जिल्हयाच्या सीमेवर असलेल्या पुणतांबा गावाजवळच्या डोणगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील पुलावरुन गोदावरचे पाणी वाहत असल्यामुळे येथील वैजापूर-श्रीरामपूर मार्ग पुरामुळे ठप्प झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जोरदार पावसामुळे डोणगाव परिसरातील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न १ नुसार शासनाने येथे भविष्यात पुन्हा प्रसंग येऊ नये यासाठी येथील एकाच उंची वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, नुकसान झालेल्या शेतपिकांचे पंचनामे करुन बाधित शेतक-यांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०६-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर बाब निदर्शनास आली नाही.

(३) सदर ठिकाणी गोदावरी नदीवर पुणतांबा को.प. बंधारा आहे. तथापि, हा रस्तापुल नसल्याने त्याची उंची वाढवण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परळ (मुंबई) येथील नौरोसजी वाडिया मॅटनिटी रुग्णालयाला राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान सुरु करण्याबाबत**

**(३३) १०३८५४ (०६-०१-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील नौरोसजी वाडिया मॅटनिटी रुग्णालयाला राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान सुरु करावे व सन २०१२ पासून थकित असलेले अनुदान त्वरीत द्यावे या मागणीसाठी रुग्णालय कर्मचाऱ्यांनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाचे सन २०१२ पासून अनुदान थकीत असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयाला अनुदान सुरु ठेवण्याबाबत व थकीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) रुग्णालय कर्मचाऱ्यांनी दिनांक ६.११.२०१७ रोजी मोर्चा काढला याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय अनुदान-२००९/प्र.क्र.४२/आरोग्य-५, दिनांक १३.०१.२०१० च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नौरोसजी वाडीया मॅटर्निटी रुग्णालय, परळ, मुंबई यांना शासन हिस्याप्रमाणे उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूदीतुन वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलूंड (मुंबई) येथील फोर्टिस रुग्णालयाबाबत**

**(३४) १०४९५२ (१९-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) येथील फोर्टिस रुग्णालयातील डॉक्टरांच्या दुर्लक्ष व निष्काळजीपणामुळे श्री दत्ता नेलंगे या रुग्णाचा दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला असताना रुग्णावरील उपचाराची २० लाखांची रक्कम दिल्याशिवाय मृत्यदेह देणार नाही अशी भूमिका रूग्णालयाने घेतली तसेच दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी फोर्टीज रुग्णालयामध्ये ठाण्यातील कोपरी येथे राहणाऱ्या १५ वर्षीय साहील भोईर या तरुणास हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी दाखल करुन घेऊन एक महिना एलव्हीएडी यूनिटवर ठेऊन नंतर हृदय प्रत्यारोपण करण्याची गरज नसल्याचे सांगून व त्याच्या उपचाराचे ३५ लाखांचे बिल त्यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फोर्टीस रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणा-या रुग्णांकडून भरमसाठ देयके वसूल करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी रुग्णांकडून स्थानिक लोकप्रतिनिधींकडे वारंवार येत असून या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जानेवारी. २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, ्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने फोर्टीस रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०१९) :** (१), (२), (३) व (४) मुंबई शुश्रुषा अधिनियम १९४९ कायद्यांतर्गत खाजगी रुग्णालयांची नोंदणी करण्याचे अधिकार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस आहेत. तसेच या कायद्याशी विसंगत नसतील असे उपविधी किंवा नियम तयार करण्याचे अधिकार देखील स्थानिक स्वराज्य संस्थेस आहेत.

फोर्टीस रुग्णालय हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असुन या खाजगी रुग्णालयाची नोंदणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेली असल्याने संबधित रुग्णालयावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत नगर विकास विभागास दि.११.३.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात नोंदणी शुल्काचा गैरव्यवहाराबाबत व पुणे जिल्हयातील चौकशी समितीच्या अहवालाबाबत

**(३५) १०७९६८ (३१-०३-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात नोंदणी शुल्काचा गैरव्यवहाराबाबतची चौकशी अपूर्णावस्थेत आहे तसेच पुणे जिल्हयातील चौकशी समितीचा अहवाल अद्यापही प्राप्त झाला नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्तबाबत सदर समितीने चौकशी पूर्ण केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार समितीने अहवाल केव्हा सादर करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१), (२) व (३) नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशी झाली असून समितीने अहवाल दि. १६.०२.२०१८ रोजी सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(३६) १०७९९० (३१-०३-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात अनेक पदे रिक्त असल्यामुळे रुग्णालयाची अवस्था दयनीय असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, किती पदे भरण्यात येणार आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, पारशिवनी येथे गट अ च्या ४ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून १ वैद्यकीय अधिक्षकाचे पद रिक्त आहे. गट क च्या १४ मंजूर पदांपैकी ११ पदे भरलेली असून ३ पदे रिक्त आहेत.तसेच गट ड च्या ७ मंजूर पदांपैकी ४ पदे भरलेली असून ३ पदे रिक्त आहेत.तथापि, कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत दैनंदिन येणा-या रुग्णांना चांगल्या व गुणात्मक सेवा नियमित पुरविल्या जात आहेत. त्यामुळे रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) गट अ चे पदभरतीसाठी शासनस्तरावरुन भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे.तसेच गट क व ड ची पदे पदोन्नती बदली व पदभरती प्रक्रियेने भरण्याची कार्यवाही सुरू झालेली आहे.

(३) गट अ चे १ पद, गट क ची ३ पदे व गट ड ची ४ पदे रिक्त असल्याने सदर पदे भरण्यात येत आहे.

---

**राज्यातील आरोग्य विभागात १ ते ४ वर्गातील हजारो पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) १०९४२२ (०६-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य विभागातील रिक्त जागांपैकी ७५ टक्के भरतीची परवानगी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१५/प्र.क्र.६४/२०१/वित्तीय सुधारण-१, दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने संचालक आरोग्य सेवा व सहसंचालक आरोग्य सेवा हिवताप, पुणे यांनी २०१६ मध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक या गट 'क' व क्षेत्रीय कर्मचारी या गट 'ड' ही पदे भरण्याची परवानगी मिळालेली असतांनाही त्यांनी आरोग्य सेवक व क्षेत्रीय कर्मचारी ही पदे भरली असून प्रयोगशाळा तंत्रज्ञाची पदे भरली नाहीत, तसेच राज्यात प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे सरासरी ६०० पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यासह रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कार्यवाही न करणाऱ्यां संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
प्रयोगशाळा तंत्रज्ञ संवर्गाची पदोन्नती कोटयातील ४१७ पदे रिक्त आहेत.
(३) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तथापि आरोग्य सेवा बाधित होऊ नये यास्तव हंगामी वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्त्ता यांना या पदावर हंगामी स्वरुपात नियुक्ती आदेश देऊन त्यांचेकडून रक्त तपासणी करुन घेण्यात येत आहे.

---

## वाशिम जिल्हयातील खासगी दवाखान्यातील जैव वैद्यकीय कच-याची बेकायदा भंगारात विल्हेवाट लावत असल्याबाबत

**(३८) ११०७७२ (०१-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील अनेक खासगी दवाखान्यातील जैव वैदयकीय कचऱ्याची बेकायदा भंगारात विल्हेवाट लावत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही सरकारी व खासगी रुग्णालयातील जैव वैदयकीय कचरा उचलुन नेण्याकरिता नेमून दिलेले मे ग्लोबल इको सेव सिस्टिम या एजन्सीची वाहने ही नियमीत येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील जैव वैदयकीय कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासोबतच यांसदर्भात असलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्या येथील खासगी रुग्णालयांवर व सदरील कंत्राटदार एजन्सीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबड-घनसावगी (जि.जालना) तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३९) ११२२२६ (०१-०४-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबड-घनसावंगी (जि.जालना, ता.परतुर ) येथील गोदावरी नदीच्या महापुरामुळे नेहमीच नदी काठावरील गावांना नैसर्गिक आपत्तीला तोंड दयावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सदर गावांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याकरीता शासनाने किती जमीन संपादित केली आहे,
(४) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(५) असल्यास, अंबड-घनसावंगी येथील गोदावरी नदीकाठावरील पुरबाधीतांच्या पुर्नवसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही. सन २००६ साली असाधारण परिस्थितीमुळे पुरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर अशी परिस्थिती उद्भवली नाही.
(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथे उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(४०) ११३४२६ (०१-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे आरोग्य केंद्र बंद पडण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, वाघोली हे गाव पुणे-नगर महामार्गावर असल्याने रुग्णांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, वाघोली येथे उपजिल्हा रुग्णालय होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) मौजे लोहगाव या ठिकाणी १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर असून रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले की सुरु करण्यात येणार आहे. वाघोली ते लोहगांव अंतर ७.८ कि.मी. इतके असल्यामुळे वाघोली येथे उपजिल्हा रुग्णालय प्रस्तावित नाही.
(४) लागू नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(४१) ११४०२४ (०१-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील ४९ गावांसाठी दोन ग्रामीण रुग्णालये व पाच प्राथमिक आरोग्य केंद्र असून या ठिकाणी अपुरे कर्मचारी, वेळोवेळी होणारी औषध टंचाई व मुख्यालयी न राहणा-या कर्मचा-यांमुळे सामान्य नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात औषधसाठा, कर्मचा-यांची ३४ रिक्त पदे व वैद्यकीय अधिका-यांची ४ पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू या रुग्णालय व आरोग्य केंद्रास पुरेसा औषधसाठा व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
नाशिक जिल्हयातील देवळा तालुक्यामध्ये ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय देवळा व ग्रामीण रुग्णालय उमराणे असे दोन ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहेत. सदर दोन्ही ग्रामीण रुग्णालयामध्ये औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात आहे. ग्रामीण रुग्णालय उमराणे येथे २५ पदे मंजुर असून कर्मचा-यांच्या एकूण २१ पदांपैकी १९ पदे भरलेली आहेत व ६ पदे रिक्त आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय देवळा येथे २५ पदे मंजुर असून १९ पदे भरलेली आहेत व ६ पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालयात येणा-या रुग्णांना उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून रुग्णसेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. तसेच दोन्ही ग्रामीण अधिकारी व कर्मचारी हे मुख्यालयातच राहतात. एकही रुग्ण रुग्णसेवापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्यात येते.
(२) तथापि, रुग्णसेवा सुरळीतपणे देण्यात येत आहे.
(३) वैद्यकीय अधिका-यांच्या ४ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून एक पद रिक्त आहे. व रिक्त पद भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे. तसेच क व ड वर्गाच्या कर्मचा-यांची पदे पदोन्नती व पदभरतीने करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात रेबीज इंजेक्शन उपलब्ध नसल्याबाबत**

**(४२) ११५३७२ (१०-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालय व शासकीय प्रसूतिगृह या दोन्ही रुग्णालयात बेवारस कुत्र्याने चावा घेतल्याची संख्या या वर्षी १२३१ पर्यंत एवढया मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असूनही सदर दोन्ही रुग्णालयात उपचारासाठी आवश्यक असणारे रेबीज इंजेक्शन उपलब्ध नसल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील २ वर्ष वयाच्या मुलाला बेवारस कुत्र्याने चावल्याने त्याला उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले मात्र त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी सायन हॉस्पिटलकडे पाठविण्यात आले मात्र सायन हॉस्पिटल येथेही रेबीज इंजेक्शन उपलब्ध नसल्याने उपचारासाठी के.ई.एम. रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वाढत असलेल्या बेवारस कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासह शासकीय रुग्णालयामध्ये रेबीज इंजेक्शनचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) बेवारस कुत्र्याने चावलेल्या २ वर्षे वयाचा मुलगा मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३ येथे दाखल झालेला नाही. बेवारस कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची कार्यवाही महापालिकामार्फत केली जाते.

रुग्णालयात श्वानदंशावरील लसीचा गरजेनुसार पुरवठा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(४३) ११५७९७ (०६-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील १९ रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्येच्या बृहत आराखडयानुसार शासन निर्णय माहे जानेवारी, २०१३ नुसार येथील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच रुग्णालयातील साधनसामुग्रीसाठी १९ लाख रुपये निधी मंजूरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सन २००१ च्या बृहत आराखडयानुसार ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालय, श्रीरामपूर याचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन झालेले आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारत व निवासस्थानाचे अतिरिक्त बांधकाम झाले नसल्याने आकृतीबंधाप्रमाणे पदे मंजूर करुन भरता येत नाही. तथापि, सद्यस्थितीत ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, श्रीरामपूर येथे एकूण २५ मंजूर पदांपैकी २० पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. ५ रिक्त पदांपैकी २ पदे सफाईगार संवर्गाची आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होत नाही. तसेच रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) सन २००१ च्या बृहत आराखडयानुसार ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालय, श्रीरामपूर याचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन झालेले आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या अतिरिक्त मुख्य इमारतीचे ७५ टक्के बांधकाम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयामध्ये आकृतीबंधाप्रमाणे पदनिर्मिती झालेली नाही व साधन सामग्रीसाठी १९ लाख रुपये निधीची मागण करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना व ठिबक सिंचन या योजनांचा वार्षिक कृती आराखडा तयार करणेबाबत

**(४४) ११५९४५ (०१-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी फळे व भाज्यांची विक्री व्यवस्था,प्रक्रिया आणि फळांच्या निर्यातीवर भर देत पुढील पाच वर्षाचे जिल्हानिहाय कृती आराखडा सादर करण्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र व राज्य पुरस्कृत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना, उन्नत शेती-समृद्ध शेतकरी अभियान चा निधी खर्च करणे, ठिबक सिंचन, नियंत्रित शेती, यांत्रिकीकरण सामुहिक शेततळे योजनेच निधी खर्च करणे अशी अनेक कामांचाही आराखडा तयार केला आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती त्यानुसार जिल्हानिहाय कृती आराखडा तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) केंद्र व राज्य पुरस्कृत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना, व ठिबक सिंचन या योजनांचा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात आला असून तो कृषी संचालनालयामार्फत दि.२२.०३.२०१९ रोजी केंद्र शासनाला मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. कृषी विभागाच्या प्रचलित योजनांच्या अंमलबजावणीत अधिक सुटसुटीतपणा व सुसुत्रता आणून योजना पारदर्शकरित्या व अधिक प्रभावीपणे राबविणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञान राज्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उन्नत शेती-समृध्द शेतकरी अभियान हे अभियान/मोहिम सुरु केली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदूरबार जिल्हयातील होराफळी (ता.अक्कलकुवा), बोरद (ता.तळोदा) व धनाजे (ता.धडगाव) येथील वैद्यकिय सेवेत झालेला गैरव्यवहार**

**(४५) ११८७४५ (०१-०८-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार जिल्हयातील होराफळी (ता.अक्कलकुवा) बोरद (ता.तळोदा) व धनाजे (ता.धडगाव) येथील फिरते (मोबाईल) मेडिकल युनिट मधीन वाहन दुरुस्ती, औषध खरेदी, स्टेशनरी छपाई व खरेदी, एक्सरे मशीन व जनरेटर दुरुस्ती इत्यादी प्रकरणी व कंत्राटी पदे भरताना नियमबाहय भरती केल्याप्रकरणी स्थापन केलेल्या चौकशी समितीने दिनाक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा आरोग्य अधिकारी, नंदूरबार व संचालक वित्त व लेखा, मुंबई यांचे कडे अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणातील दोषीवर कारवाई करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) नंदुरबार जिल्ह्यात कार्यरत मोबाईल मेडिकल युनिटच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात स्थानिक पातळीवर चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार मोबाईल मेडिकल युनिट अंतर्गत गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्याने संबंधित वैद्यकीय

अधिकारी यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करणेबाबतचा विहीत नमुन्यातील प्रस्ताव दि. ४ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये आरोग्य सेवा संचालनालयाकडून मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरशेत (ता.जव्हार, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) १२१८८० (०६-०८-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरशेत (ता.जव्हार, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण ९ उपकेंद्रात एकुण ४० पदापैकी फक्त १४ पदे भरलेली असून २६ पदे रिक्त असल्याचे दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदामुळे तेथील गरजू, गरीब व आदिवासी जनतेला आरोग्य सेवा पुरविणे गैरसोयीचे होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने National Rural Health आरोग्यसेवा योजनेंतर्गत कंत्राटपद्धतीने डॉक्टर, नर्स, शिपाई पदे भरून सुद्धा सदर पदे अपूरी पडत असल्याने स्थानिक रुग्णावर योग्य उपचार होत नसल्याने त्यांना शहरातील खाजगी रुग्णालयामध्ये उपचार करावे लागत असल्याने रुग्णांना आर्थिक विवंचनेस सामोरे जावे लागत आहे,हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्या अनुषंगाने स्थानिक रुग्णांना वेळीच उपचार मिळण्यासाठी सदर रिक्त पदे तत्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र साखरशेत येथे नियमित स्वरुपातील एकूण मंजूर १५ पदे असून त्यापैकी भरलेली १० व रिक्त ०५ आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र साखरशेत अंतर्गत ०८ उपकेंद्रे कार्यरत असून सदर उपकेंद्रात २४ मंजूर पदे असून १७ भरलेली व ०७ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत तेथील गरजू, गरीब व आदिवासी जनतेला आरोग्य सेवा सुरळीतपणे पुरविण्यात येत आहेत.
(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य पथक व उपकेंद्राच्या ठिकाणी ०२ आरोग्य सेविका (महिला) यांना जिल्हा परिषद सेस निधीमधून नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानमधून कंत्राटी स्वरुपात उपकेंद्राच्या ठिकाणी ०५ आरोग्य सेविका (महिला) भरण्यात आलेल्या आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य पथके येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना उपचार देण्यात येत आहेत.

(४) व (५) प्राथमिक आरोग्य केंद्र साखरशेत येथील नियमित स्वरुपात रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही ग्रामविकास विभागाकडून करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वाडिया रुग्णालयाचे तब्बल ११६ कोटी रुपये थकविल्याबाबत**

**(४७) १२७०८६ (०५-१२-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लहान मुलांच्या असाध्य आजारावरील आशास्थान म्हणून प्रसिध्द असलेल्या वाडिया रुग्णालयाचे तब्बल ११६ कोटी रुपये आरोग्य विभाग व मुंबई महानगरपालिकने थकविल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडीया रुग्णालयाची थकबाकी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू रक्कम वेळेत न मिळाल्यास रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होणार असल्यामुळे थकबाकीची रक्कम वाडीया रुग्णालयाला त्वरीत देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

बाई जेरबाई वाडिया चिल्ड्रन्र्स हॉस्पीटल, परळ या लहान मुलांच्या रुग्णालयास आरोग्य विभागाकडून सहाय्यक अनुदान दिले जात नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोर्टी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील खाजगी रूग्णालयात रूग्णाचा झालेला मृत्यू**

**(४८) १३१२३३ (११-१२-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोर्टी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील एका खाजगी रूग्णालयात कै.हसन शेख या ४० वर्षीय इसमाचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे निधन झाले असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मयत इसमांच्या नातेवाईकांनी सुमारे ५ तास रुग्णालयात ठिय्या आंदोलन करून मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी खाजगी रूग्णालयात रुग्णावर उपचारात हलगर्जीपणा झाला असून मयत इसमाचे वैद्यकीय अहवाल ही (मेडिकल रिपोर्ट) दाखविण्यास टाळाटाळ केली असून रूग्णालय प्रशासनाच्या गैरकारभारामुळे रुग्णाचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी या खाजगी रूग्णालय प्रशासनावर गुन्हा दाखल करून चौकशीची मागणी मयत कुटूंबियांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी कै. हसन शेख यांचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाला नसून तो उपचार चालू असताना झालेला आहे.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या समितीने चौकशी केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४९) १३१५४४ (११-१२-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत होऊन एक वर्ष झाले तरी या रुग्णालयातील काल्पनिक कुशल व अकुशल पदे अद्याप भरण्यात आलेली नसून स्वच्छता, सुरक्षा, धुलाई, आहार व कंत्राटी वाहन चालक या वैद्यकीय कंत्राटी सेवा अद्याप सुरू झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सेवा सुरू न झाल्यामुळे सदर रुग्णालयाची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाचा पीआरबी करार न झाल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रुग्णालयाच्या इमारतीची देखभाल दुरुस्ती करता येत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयातील कंत्राटी सेवा व पदे भरण्याबाबत तसेच रुग्णालय पीआरबी वर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सेवा सुरु झाल्या नाहीत हे खरे आहे मात्र इतर भरलेली कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत वैद्यकीय सेवा देणे सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) कंत्राटी काल्पनिक (अकुशल) पदे ही आहार, सुरक्षा, स्वच्छता व वस्त्रधुलाई शी निगडीत असून बाह्य सेवेंतर्गत कंत्राटी पद्धतीने भरावयाची असल्याने :- १) आहार सुरक्षा व स्वच्छता सेवांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून सदर सेवा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

२) काल्पनिक पदांच्या सेवाशर्ती एकत्रीत वेतन व कर्तव्य जबाबदाऱ्या निश्चीत करण्याबाबतचा प्रस्ताव आरोग्य सेवा संचालनालयाकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परसोडा (जि.औरंगाबाद) येथे आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(५०) १३३८०५ (११-१२-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परसोडा (जि.औरंगाबाद) येथे आरोग्य उपकेंद्राची इमारत बांधण्यासाठी ७० लाख रुपये खर्च करण्यात आले असून सदर उपकेद्रात डॉक्टरांसह कर्मचारी नसल्याने सदर उपकेंद्र सुरु झाले नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या उपकेंद्रात कायमस्वरुपी डॉक्टरसह कर्मचा-यांची नियुक्ती करुन सदरील आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही

परसोडा येथील उपकेंद्रची नवीन इमारत दि.१७.०५.२०१८ रोजी हस्तांतरित झाली असून या नवीन इमारतीत उपकेंद्र कार्यान्वीत मंजूर झाले आहे. आकृतीबंधानुसार उपकेंद्रासाठी डॉक्टरचे पद मंजूर नाही. प्राथमिक स्वरुपाच्या उपचारांस्तव आरोग्य सेवक व आरोग्य सेविका व स्त्री परिचर यांची पदे मंजूर आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) या उपकेंद्रात आरोग्य सेविका व आरोग्य सेवक व स्त्री परिचर हे कार्यरत आहेत. बदलीने रिक्त झालेल्या आरोग्य सेवकाचा अतिरिक्त कार्यभार उपकेंद्र पालखेड येथील आरोग्य सेवक यांच्याकडे देण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.